प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294; email: ratambepriya@gmail.com

**दि. २१.०७.२०२०**

**सिडको गृहनिर्माण योजनेतील यशस्वी अर्जदारांसाठी ऑनलाईन माध्यमातून अपिलावरील सुनावणी**
**टाळेबंदीच्या पार्श्वभूमीवर सिडकोचा निर्णय**

कोविड-१९ विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी सुरू असलेल्या देशव्यापी टाळेबंदीच्या पार्श्वभूमीवर सिडको महामंडळातर्फे निवारा केंद्र या पोस्ट लॉटरी पोर्टलमार्फत गृहनिर्माण योजनेच्या सोडतीनंतर पार पाडण्यात येणाऱ्या सर्व प्रक्रिया व त्याचप्रमाणे अर्जदारांनी अपिल केल्यानंतर त्यांच्या अपिलावरदेखील पूर्णतः ऑनलाईन माध्यमातून सुनावणी पार पाडण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

सिडको महामंडळाच्या विविध गृहनिर्माण योजनांच्या सोडतीनंतर यशस्वी अर्जदारांतर्फे सादर करण्यात येणाऱ्या कागदपत्रांची पडताळणी करण्यासाठी सिडकोतर्फे निवारा केंद्र www.cidco.nivarakendra.in सुरू करण्यात आले होते. या पोर्टलद्वारे अर्ज व कागदपत्रे सादर करणे, कागदपत्रांची छाननी करणे, ऑनलाइन तक्रार प्रणाली, अर्जाची सद्यस्थिती पाहणे या प्रक्रिया ऑनलाइन पार पाडण्यात येतात. टाळेबंदीच्या काळातदेखील सिडकोतर्फे अंदाजे ६००० अर्जदारांच्या कागदपत्र पडताळणीचे काम यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आले आहे. याचबरोबर पोर्टलच्या माध्यमातून सुरू करण्यात आलेल्या ऑनलाईन अपिल सुनावणीविषयीदेखील अर्जदारांना मार्गदर्शन करण्याकरिता पोर्टलवर माहिती आणि व्हिडीओही उपलब्ध करून देण्यात आले आहेत. तसेच पुढील टप्प्यांबाबत अर्जदारांना एसएमएस, फोन कॉल, ई-मेल द्वारे वेळोवेळी कळविण्यात येते.

सिडकोतर्फे देण्यात आलेल्या या सुविधेमुळे अर्जदारांना आता कागदपत्र पडताळणी व अपिलावरील सुनावणी या दोन महत्वाच्या गोष्टींसाठी व्यक्तिगतरित्या उपस्थित रहाण्याची

आवश्यकता नाही. या दोन महत्वाच्या बाबीदेखील पूर्णतः ऑनलाईन माध्यमातून पार पाडण्याचा सिडकोने निर्णय घेतला आहे. यामुळे अर्जदार घरबसल्या अपिलाच्या सुनावणीसाठी ऑनलाईन माध्यमातून उपस्थित राहू शकणार आहे. सदर केंद्रातर्फे पार पाडण्यात येणाऱ्या सर्व प्रक्रिया या सुलभ, सुरक्षित व पारदर्शक अशा ऑनलाइन पद्धतीने पार पाडण्यात येत असल्याने अर्जदारांना निवारा केंद्राच्या किंवा सिडकोच्या कार्यालयास भेट न देता घरबसल्या या सेवा प्राप्त होणार असल्यामुळे अर्जदारांचा अमूल्य वेळ वाचण्याबरोबरच त्यांना कोविड - १९ या पॅनडेमिकच्या पार्श्वभूमीवर घरबसल्या सुरक्षितपणे या सेवांचा लाभ घेणे शक्य होणार आहे.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

मा. संपादक महोदय,
वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.

**जनसंपर्क विभाग, सिडको**